## नि.दि.दा.क्र.६१/२०२२, अर्ज निशाणी ७६ खालील आदेश
(CNR MHSI080004222022)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचे विरुध्द झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द करुन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी परवानगी मिळणेस विनंती केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेविरुध्द दि.०३/०३/२०२३ रोजी विना कैफियत आदेश झाला होता. प्रतिवादी क्र.२ व ३ हे कामधंद्यानिमित्त मुंबई येथे राहतात. त्यामुळे, दाव्यासंदर्भातील आवश्यक असणारे जुने कागदपत्र मिळवणेकामी त्याने विविध शासकीय कार्यालयात अर्ज केले होते. मात्र सदरचे आवश्यक कागदपत्र त्याला मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्याला आवश्यक ती माहिती व कागदपत्रे आपल्या वकिलांना मुदतीत पुरवता आली नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी कैफियत दाखल करणेस जाणून बुजून टाळाटाळ केलेली नाही. सबब, त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

०२. वादीने नि.क्र.७६ वर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, सदर अर्ज खोटा व खोडसाळ आहे. कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ या मुंबई हून येऊन प्रस्तूत दाव्याचे कामी कोर्टात तारखेस हजर राहत आहेत. प्रतिवादी यांना दावा समन्स बजावणी झाल्यानंतर सुमारे एक वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. विहीत मुदतीत कैफियत न दिल्यामुळे त्यांचे विरुध्द

विनाकैफियत आदेश झाला होता. त्यानंतर, सदर आदेश रद्द करुन मिळण्याकरीता झालेल्या सुमारे एक वर्ष विलंबाचे कोणतेही कारण दिलेले नाही. वादी यांना नाहक त्रास देण्याकरीता व दावा चौकशीस विलंब करण्याकरीता प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत देण्याचे टाळले आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सदर दावा वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा अंतिमतः निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास सर्व निर्णायक वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यामुळे, अर्जदार/प्रतिवादींना त्यांचे कथन अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रतिवादी/अर्जदार यांचेकडून झालेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून वादीला खर्च देण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: आदेश ::**

१. निशाणी क्र.७६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.६००/-(रूपये सहाशे फक्त) वादीस द्यावेत.

३. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

सही/-

दिनांक – १४/०२/२०२४

(टी.एच.शेख)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.